पिंपरी चिंचवड महानगरपालिका
लेखा विभाग
क्र.लेखा/०५/कावि/ ३५८५/२०१८
दिनांक :- २२ ३/२०१८

परिपत्रक,

**विषय :-** वस्तू व सेवा कर कायद्यांच्या अंमलबजावणी पूर्वीची बिले अदायगीबाबत.

**संदर्भ :-**
१) परिपत्रक क्र.लेखा/०५/कावि/८४७/१७ दि.१/७/२०१७
२) मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र.लेखा/०५/कावि/६३८५/२०१७ दि.२५/७/२०१७
३) परिपत्रक क्र.लेखा/०५/कावि/६६६३/१७ दि.२/८/२०१७
४) परिपत्रक क्र.लेखा/०५/कावि/७०१९/१७ दि.१४/८/२०१७
५) परिपत्रक क्र.लेखा/०५/कावि/७४०३/१७ दि.२८/८/२०१७
६) परिपत्रक क्र.लेखा/०५/कावि/७५६७/१७ दि.४/९/२०१७

वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी दि.१/७/२०१७ पासून सुरू करण्यात आली असून त्यापुर्वीची जुन्या कर पध्दतीनुसार देय असलेली महसूली व भांडवली कामांची देयके अदायगी कामी लेखा विभागाकडे पाठविणेबाबत सदंर्भिय १ ते ६ चे परिपत्रकान्वये वेळोवेळी सर्व विभागांना कळवून याची अंतिमत: मुदत दि.५/१०/२०१७ अशी देण्यात आली होती. तथापि, अद्यापही जुन्या कर प्रणालीतील अशी बिले लेखा विभागाकडे सादर करण्याबाबत संबधितांकडून वारंवार विचारणा केली जात आहे. अशा सर्व बिलांची चालू आर्थिक वर्षात (२०१७ – १८) अदायगी होणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता अशी सर्व बिले संबधित विभागप्रमुखांनी दि.२३/३/२०१८ पर्यंत लेखा विभागाकडे अदायगी कामी न चुकता सादर करावी. त्यानंतर ही देयके स्विकारण्यात येणार नाहीत.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८

प्रति :- सर्व संबधित विभागप्रमुख